तरुण भारत
सातारा
www.tarunbharat.com
₹ ४.०० बुधवार दि. ७ ऑक्टोबर २०१५ बेळगाव

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# मानवी जीवनात श्रमदानाला महत्त्व

## प्रा. श्रीधर साळुंखे यांचे प्रतिपादन, राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्‌घाटन

प्रतिनिधी
कोरेगाव

रक्ताच्या नात्यापेक्षा मित्रत्वाचे नाते श्रेष्ठ असते. मानवाच्या वर्तनामध्ये परिवर्तन घडविते तेच शिक्षण होय. भूतकाळातील ज्ञानाचा उपयोग आजच्या व्यवहारात उपयोग नसतो मानवाच्या जीवनात श्रमदानाला अधिक महत्त्व आहे. श्रमदानाचे मूल्यच होवू शकत नाही. असे प्रतिपादन प्रा. श्रीधर साळुंखे यांनी केले.



येथील रयत शिक्षण संस्थेच्या डी. पी. भोसले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उद्‌घाटन समारंभात प्रा. साळुंखे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत उपस्थित होते.

प्रा. साळुंखे पुढे म्हणाले, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यावर श्रमदानातून चांगले संस्कार घडविता येतात. यश आणि सुख यामध्ये खूपच अंतर असते. स्पर्धेच्या युगात मानवतेचा ऱ्हास होत आहे. सहानुभूतीची भीक न मागता विद्यार्थ्यांनी श्रमाची तयारी ठेवावी. त्यामुळे आयुष्यात काही कमी पडणार नाही. मात्र यासाठी विद्यार्थ्यांनी ज्या गोष्टीचे ध्येय घेतले असेल त्याचा पाठपुरावा करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात एक ध्येय ठेवावे, आणि त्या ध्येयाचा पाठलाग करताना सर्वस्व पणाला लावावे, तरच त्यामध्ये आपण यशस्वी होतो

यावेळी सातारा जिल्हा सैनिक कल्याण बोर्डाचे अधिकारी लेफ्ट. कर्नल राजेंद्र कुमार जाधव यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्यासाठी सैन्यात उपलब्ध असलेल्या नोकरीच्या विविध संधीविषयी मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सावंत म्हणाले, विद्यार्थ्यांच्यात श्रमदानातून बहुजन समाजाच्या बांधिलकीचे नाते निर्माण होते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून जे विविध उपक्रम राबविले जातात त्यातून खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो. एवढेच नव्हे तर समाज व विद्यार्थ्यांच्यातील समतेची, मानवतेची व समाज सेवेची नाळ जोडली जाते.

प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. जी. सायकर यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दत्तात्रय गाताडे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी, उपस्थित होते.

सूत्रसंचालन इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. उज्वला मदने यांनी केले. आभार प्रा. एन. एम. गोसावी यांनी मानले.